Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

दैनिक

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

वरुड | शनिवार

०९.०५.२०२६

+91 7745067712 | वर्ष:०७ | अंक:९८ | पृष्ठे:०६ | किंमत:०२

www. waruddarpan.com | chandubhad@gmail.com

## थोडक्यात

### 'पॉश'चे उल्लंघन केल्यास ५० हजारांचा दंड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिक येथील 'टीसीएस' कंपनीत घडलेल्या गंभीर प्रकाराची दखल घेत राज्य सरकारने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक (पॉश) कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

महिला व बालविकास आयुक्त जगदीश मिनियार यांनी शुक्रवारी या संदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या. पॉश कायद्यानुसार १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय आणि खाजगी आस्थापनांना अंतर्गत तक्रार समिती (आयसीसी) स्थापन करणे बंधनकारक आहे तसेच या समितीची नोंदणी केंद्र सरकारच्या 'शी-बॉक्स' पोर्टलवर करणे अनिवार्य आहे.

## पवार आजारातून बाहेर, रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी फेरनिवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सातारा** – राज्यसभा निवडणुकांनंतर खासदारकीची शपथ घेतल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार आजारी होते. तसेच, गेल्या काही दिवसांपासून ते सार्वजनिक कार्यक्रमातूनही दूर होते.

मात्र, आज साताऱ्यातील कार्यक्रमातून त्यांच्या जोमाने कामाची नव्याने सुरुवात झाली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी शरद पवार यांची पुन्हा एकदा वर्णी लागली असून सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी शरद पवार हेच रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज त्यांनी रयत शिक्षण संस्थेतील कार्यक्रमास हजेरी लावत भाषण केलं.



रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाच्या निवडी दरम्यान अध्यक्ष पदासाठी एकच अर्ज आल्यामुळे शरद पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, आपण कुठं कमी पडलो, नवीन काय करता येईल याबाबत आपण विचार करायला हवा. सर्वसामान्य लोकांसाठी कर्मवीरांनी आदर्श दिला, तोच आदर्श आम्ही पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत.

संस्थेसाठी अखंड काम करणारे आहेत, म्हणून आज संस्थेची उंची वाढली आहे. सर्व सेवकांचे मी अंतःकरणापासून आभार मानतो, असे म्हणत शरद पवारांनी पुन्हा एकदा रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीनंतर भाषण केलं.

आधीच्या बैठकीत मी आग्रह केला होता, जग बदलत आहे. नवी संकल्पना जगान स्वीकारली आहे, आपण देखील ती स्वीकारायला हवी. अख स्वीकारून रयत संस्था जगाबरोबर न्यायला पाहिजे. हितचिंतकांकडून संस्थेला मोठी देणगी मिळाली आहे, त्याचे आम्ही आभार मानतो. संस्थेत नवीन काही करण्यासाठी चर्चा झाली आहे. परदेशात ज्या संस्था आहेत, त्याच्यासोबत रयत जोडून मुला-मुलींच्या ज्ञानात भर घालण्याचा प्रयत्न आहे, असेही शरद पवार यांनी यावेळी म्हटले.

खेडेगावातील मुले अख बाबत बोलतात याचा आनंद कर्मवीर अण्णांनी अतिशय कष्टाने दूरदृष्टी ठेऊन गोरगरीब मुला मुलींना ध्यानाचे दरवाजे खुले व्हावेत यासाठी काम केलं. संस्थेच्या माध्यमातून खेडेगावतील मुलं मुली आज अख बाबत बोलायला लागली, चर्चा करायला लागली ही जमेची आणि कौतुकाची बाब आहे.

रामशेठ ठाकूर हे दरवर्षी संस्थेला मदत देत असतात, यावर्षी ३ कोटींपेक्षा जास्त निधी त्यांनी दिला आहे. आता, नव्या पीढीपुढे, रयत सेवकांपर्यंत चांगल्या कामाचा कसा आदर्श राहील यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही शरद पवारांनी म्हटले.

## रस्त्याच्या कडेला लावलेला ट्रक अचानक ५० फूट खोल दरीत कोसळला, चिमुकल्यासह ४ जणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सातारा** – सातारा तालुक्यातील कासरतळेमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. या ठिकाणी आयशर ट्रक ५० फूट खोल दरीत कोसळला आहे.

या भीषण अपघात ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मिळालेली माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला लावलेला ट्रक अचानक दरीत कोसळल्यामुळे मोठा अपघात घडला आहे. या ट्रकमध्ये पुनर्वसन घरातील सगळे साहित्य भरून दुसरीकडे जाण्याच्या तयारीत होता.

अशातच कासरतळे गावाजवळ हा ट्रक उभा असताना अचानक हा अपघात झाला. ट्रकमध्ये साहित्य भरत असताना रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात आयशर ट्रक कोसळला. या अपघातामध्ये एका लहान





मुलासह ३ महिलांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दुसरीकडे, या ट्रकमधील काही पशु जनावरांचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे. सध्या अपघातातील जखमी दोघांवर सातारा जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे.

तर या अपघातात ड्रायव्हर बचावल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच सातारा तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील कारवाई ते करत आहे.

## दहावीत कमी गुण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचं टोकाचं पाऊल

### 'अगली बार आऊंगा, सबका मनपसंद बन कर' स्टेट्स ठेवत स्वतःला धरणात झोकून दिलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अकोला** – राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल काल (५ मे शुक्रवारी) दुपारी जाहीर झाला. यावर्षी राज्याचा दहावीचा निकाल ९२.९ टक्के लागला आहे.



असे असताना परीक्षा म्हटल्यावर प्रत्येकाला त्यात यश येईलच असे देखील नाही. अनेकांना यात अपयश देखील येत असतं. मात्र पुन्हा परीक्षेची तयारी करून त्यात यश मिळवण्याची हमी नक्कीच असते. पण त्यासाठी स्वतःवर विश्वास आणि अभ्यासाची तयारी तितकी हवी. मात्र तात्पुरतं अपयश इतकं मोठं समजून यात काही विध्यार्थी अगदी टोकाचा दुर्दैवी निर्णय घेत असतात. असाच एक खळबळजनक प्रकार अकोला शहरातून समोर आला आहे. अपेक्षेप्रमाणे कमी गुण मिळाल्यामुळे नागपूर संभाजीनगर आणि धारावीनंतर आता अकोला जिल्ह्यातही शालेय विद्यार्थ्यांने आत्महत्या करत आपली जीवनयात्रा संपवली आहे. 'अगली बार आऊंगा, सबका मनपसंद बन कर', सोशल मीडियावर स्टेट्स मिळालेल्या माहितीनुसार, दहावीच्या परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे अकोल्यात एका विद्यार्थ्यांने टोकाचं पाऊल उचललं आहे. 'विठ्ठल संतोष बोर्डे' असं आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव असून तो मूळचा अकोला जिल्ह्यातील शिंगोली गावातील रहिवासी आहे. त्याने कारंजा रमजानपूर येथील धरणात उडी घेत आत्महत्या केलीय. 'अगली बार आऊंगा, सबका मनपसंद बन कर' अशाप्रकारे सोशल मीडियावर स्टेट्स विठ्ठलने ठेवत, हा टोकाचा निर्णय घेतलाय. या घटनेने अकोला जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

## नागठाणा येथील जैन मंदिरातुन ५ अष्टधातुच्या मुर्तींची चोरी

### ३१ किलो वजनाचा मुद्देमाल लंपास : अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या नागठाणा येथील पार्श्वोदय तीर्थक्षेत्र जैन मंदिर परिसरातुन अज्ञात चोरट्यांनी पाच अष्टधातुच्या मुर्ती आणि एका पाषाण मुर्तीवरील छत्र चोरुन नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मंदिराच्या पुजाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गेल्या ७ वर्षांपासून या मंदिरात पुजारी म्हणुन कार्यरत असलेल्या फिर्यादींनी दिलेल्या माहितीनुसार, ६ मे २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास मंदिरातील सर्व मुर्ती वेदीवर सुरक्षित होत्या. मंदिरात पुजारी, १० कर्मचारी, २ माताजी आणि १ जैन साधु असे सर्वजण आपापल्या खोलीत झोपले होते. ७ मे च्या पहाटे ५ वाजता लता मनोहरे महात्मे यांनी पुजाऱ्यांना मुर्ती दिसत नसल्याचे सांगितले. जेव्हा पुजाऱ्यांनी तपासणी केली तेव्हा वेदीवरील महत्त्वाच्या ५ अष्टधातुच्या मुर्ती आणि एका मुर्तीवरील छत्र चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

वेदीवर श्री आदिनाथ स्वामी मुर्ती ९ इंच किंमत २१ हजार रुपये, मुनीसुव्रतनाथ मुर्ती ७ इंच किंमत ९ हजार रुपये, श्री विमलसागर गुरुमुर्ती ५ इंच किंमत ७ हजार रुपये, सन्मती सागर गुरुमुर्ती ५ इंच किंमत ७ हजार रुपये, पद्मावती देवी मुर्ती ७ इंच किंमत ९ हजार रुपये, पाषाण मुर्तीवरील छत्र किंमत ४ हजार रुपये असा एकुण ५७ हजारांचा माल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे. या प्रकरणी फिर्यादी पुजारी रुपेश किशोर ईदाने (४१), रा.सोमवार वेष आकोट, ता.आकोट, जि.अकोला, ह.मु.पार्श्वोदय तीर्थक्षेत्र नागठाणा देवस्थान रवाळा, ता.वरुड यांच्या तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुध्द भांदवि ३०५ डी बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली शेंदुरजनाघाट पोलिस करीत आहे.

## नागपूरच्या 'त्या' आरटीओ अधिकाऱ्याला मोठा दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – नागपुरातील मानकापूर उड्डाणपुलावर झालेल्या शालेय बसच्या दुर्दैवी अपघात प्रकरणी निलंबित करण्यात आलेले आरटीओ अधिकारी किरण बिडकर यांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) मोठा दिलासा दिला आहे. मॅटने बिडकर यांच्या निलंबनाला पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली असून, त्यांना पदावर पूर्ववत कार्यरत राहण्याचे निर्देश दिले आहेत. नागपूर विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आमदार नितीन राऊत यांनी मानकापूर



उड्डाणपुलावरील अपघाताचा मुद्दा उपस्थित केला होता.

या अपघाताला आरटीओ प्रशासनाचा निष्काळजीपणा जबाबदार असल्याचा आरोप करत बिडकर यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली होती. या चर्चेदरम्यान सरकारने बिडकर यांना निलंबित करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, दोन दिवसांपूर्वी राज्य शासनाने त्यांच्या निलंबनाचे अधिकृत आदेश काढले होते.

मॅटचा हस्तक्षेप आणि सरकारवर ताशेरे शासनाच्या या निर्णयाला किरण बिडकर यांनी तातडीने 'मॅट'मध्ये आव्हान दिले. या प्रकरणावर सुनावणी करताना मॅटने अत्यंत कडक ताशेरे ओढले.



# तमिळनाडूतील राज्यपालांच्या तिढ्यानंतर आता २ आमदार असलेल्या पक्षांकडून टीव्हीकेकडे मोठी मागणी

## बहुमताची जुळवाजुळव झाली की नाही?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चेन्नई** – टीव्हीके प्रमुख विजय आणि इतर नेत्यांनी राज्यपालांना शनिवार (९ मे) हा दिवस शुभ असल्याचे सांगितले असले, तरी तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी शपथविधीबाबत कोणतेही ठोस आश्वासन दिलेलं नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ते अजूनही (बहुमतासाठी आवश्यक असलेल्या) संख्याबळाच्या मुद्द्यावर ठाम आहेत. दरम्यान, राजभवनाकडून उद्या होणाऱ्या शपथविधीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेली नाही. सूत्रांनुसार, व्हीसीके उपमुख्यमंत्रिपदाची मागणी करत आहे, तर टीव्हीकेने मंत्रिपदाला सहमती दर्शवली आहे. हाच कळीचा मुद्दा आहे.

दोन डाव्या पक्षांचा पाठिंबा शुक्रवारी (८ मे) दोन डाव्या पक्षांनी अभिनेता सी. जोसेफ विजय यांनी स्थापन केलेल्या 'तामिळगा वेट्री कझगम' (ढतघ) पक्षाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला.



नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत स्वबळावर लढणाऱ्या ढतघ पक्षाला आता काँग्रेस (५), उझख (२) आणि उझख(च) (२) या पक्षांच्या आणखी नऊ आमदारांचा पाठिंबा मिळाला आहे.

आणखी दोन आमदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता विधानसभा निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला किंवा आघाडीला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने जनतेचा कौल विभागला गेला होता; या निवडणुकीत ढतघ पक्षाने १०८ जागांवर विजय मिळवला (यात विजय यांनी जिंकलेल्या दुसऱ्या जागेचाही समावेश आहे). ११ आमदारांच्या बहुमताचा आकडा सिद्ध करण्यासाठी या पक्षाला आता आणखी दोन आमदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे.

आमचा पाठिंबा बाहेरून असेल चेन्नई येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना, अनुक्रमे उझख आणि या पक्षांच्या राज्यस्तरीय नेत्यांनी एम. वीरपांडियन आणि पी. षण्मुगम यांनी सांगितले की, आम्ही ढतघ च्या मंत्रिमंडळात सहभागी होणार नाही; आमचा पाठिंबा बाहेरून असेल. जातीयवादी शक्तींना विरोध करण्यासाठी आणि तामिळनाडूचे हक्क अबाधित राखण्यासाठी चाललेल्या संघर्षात आम्ही ऊ्रघ पक्षासोबतच वाटचाल करत राहू.

# मालमत्ताधारकांना आता मिळणार 'अंतिम मालकी': नव्या कायद्याचा सरकारचा प्रस्ताव

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र सरकार लवकरच राज्यातील मालमत्ताधारकांसाठी एक क्रांतिकारी कायदा आणण्याच्या तयारीत आहे.

मालमत्तेचे वाद आणि वर्षानुवर्षे चालणाऱ्या न्यायालयीन लढायांपासून जनतेला दिलासा देण्यासाठी 'महाराष्ट्र लँड टायटलिंग ॲक्ट' प्रस्तावित करण्यात आला आहे. या कायद्यामुळे मालमत्तेच्या 'गृहीत मालकी'ऐवजी आता नागरिकांना 'अंतिम आणि कायदेशीर मालकी हक्क' मिळणार आहेत.

पुढील महिन्यात होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. सध्याच्या व्यवस्थेत जमिनीचा ताबा सिद्ध करता येतो, मात्र मालकी हक्क निर्विवादपणे सिद्ध करणारा कायदा अस्तित्वात नाही.

# मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत शिबिराचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने शहरातील हृदयविकारग्रस्त रुग्णांसाठी मोफत अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत स्टेट बँक पाठीमागे असलेल्या रुग्णालयात पार पडणार आहे.



शिबिरामध्ये हृदयविकाराने त्रस्त रुग्णांची तपासणी करून आवश्यकतेनुसार अँजिओग्राफी करण्यात येणार असून गरज भासल्यास अँजिओप्लास्टी देखील मोफत केली जाणार आहे. वर्धा, मोर्शी तालुका तसेच मुलताई, पांढुर्णा, बैतूल परिसरातील हृदयविकारग्रस्त रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरासाठी येताना रुग्णांनी आधार कार्ड, महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेचे कार्ड तसेच उपचाराशी संबंधित सर्व कागदपत्रे सोबत आणावीत, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

## पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या उपस्थितीत

# चारुदत्त चौधरी यांना शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सुप्रसिद्ध लोक कलावंत पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या विशेष उपस्थितीत चारुदत्त चौधरी यांना नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे प्रतिष्ठित असा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येऊन त्यांचा भावपुर्ण गौरव करण्यात आला.

शिर्डी लोकसभा मतदार संघांचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देत हा सन्मान करण्यात आला.



याप्रसंगी आमदार बच्चु कडु व रविकांत तुपकर विशेष अतिथी म्हणुन उपस्थित होते. संजीवनी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर सानप यांच्या मार्गदर्शनात पार पडलेल्या या सोहळ्यात चारुदत्त चौधरी यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियात तसेच सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने केलेल्या भरीव कामगिरीमुळे हा सन्मान त्यांना दिला जातोय, असे आदराने सांगण्यात आले.

यापुर्वीही त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्र सरकार, राज्य सरकार, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, ज्युनियर चेंबर इंटरनॅशनल, गांधी पीस फाऊंडेशन, नेपाळ अशा अनेक प्रतिष्ठित संघटनाकडून गौरविण्यात आले आहे. सध्या ते जेसीआयचे राष्ट्रीय प्रशिक्षक असून अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या विदर्भ प्रांत सचिवपदी आहेत आणि विवेकानंद केंद्र अमरावतीचे अमृत परिवार आयामाचे दायित्व वहन करीत आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ.गोविंद कासट, नितीन काकडे, डॉ.नारायण मेहरे, अभय खेडकर, डॉ.पुरुषोत्तम गावंडे, डॉ.शोभा गायकवाड, डॉ.दिलीपसिंह खांबरे, अशोक हांडे, संजय पितळे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश स्कूलची

# १०० टक्के निकालाची परंपरा कायम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ तर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये बेनोडा (शहीद) येथील न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये आर्या प्रमोद पांडे हिने ९१.२० टक्के घेऊन प्रथम आली आहे व प्राची



प्रेमराज चिंचमलापुरे ८९.६० टक्के घेऊन द्वितीय तर राम राजेंद्र ठाकरे ८८.८० टक्के घेऊन तृतीय आला आहे तसेच राम चरपे ८८.६०, योगेश्वरी पावडे ८८.४०, समीक्षा फुले ८६ , दिव्यदिता गलफट, विशाखा राठी, वेध खांडवे, स्वरित मालपे या सर्व विद्यार्थ्यांनी ८० टक्के च्या वर गुण घेऊन शाळेचे नाव लौकीक केलेले आहे. सर्व गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केल्या जात आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे व शाळेचे गुरुसेवा शैक्षणिक विकास संस्थाध्यक्ष अमोल निंभोरकर, उपाध्यक्ष पंकज गोहाड, सचिव स्वाती निंभोरकर व संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक हर्षल झोड, वर्ग शिक्षिका मयुरी निशान, विषय शिक्षिका निकिता थोर, अरुणा लाड, सुनिता कोठे, अश्विनी श्रीराव, वैशाली अंबाडकर आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाची

# उज्वल यशाची परंपरा यावर्षीही कायम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – माध्यमिक शालांत परीक्षा वर्ग दहावी २०२६ च्या घोषित झालेल्या निकालमध्ये स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाने यशाची परंपरा यावर्षीही कायम राखली आहे.

विद्यालयाचा एकुण निकाल ९८.०४ टक्के लागला असून एकुण ३०७ विद्यार्थ्यांपैकी १२३ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत तर तब्बल ९८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले



आहेत तर ६८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व १२ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. विद्यालयातुन सौम्य सागर खंडेलवाल ९७.०० टक्के घेऊन प्रथम तर अक्षदा निलकंठ बेंडे ९५. ८० टक्के घेऊन द्वितीय तर अदिती विजय लांडगे ९५ टक्के घेऊन तृतीय येण्याचा मान मिळवला आहे. एकुण विद्यार्थ्यांपैकी ७५ टक्के विध्यार्थी प्राविण्य तसेच प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. अतिशय गुणवत्तापुर्ण लागलेला या निकालचे वरुड परिसरात जागृत विद्यालयाचे कौतुक होत आहे.

गुणवत्ता पुर्ण लागलेल्या या निकालाचे जागृत नवयुवक शिक्षक संस्थेचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी, उपाध्यक्ष डॉ.मनोहर आंडे, सचिव संतोष क्षीरसागर व सर्व पदाधिकारी, प्राचार्य विजय आडे, उपमुख्याध्यापक पाटील, पर्यवेक्षिका मेश्राम व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधु भगिनी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## एनटीआर हायस्कूलची यशाची परंपरा कायम

# दहावी बोर्ड परीक्षेत संयम विटाळकर तालुक्यातुन प्रथम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था, वरुड द्वारा संचलित नामदेवराव तुकारामजी रडके हायस्कूल व शंकरराव बंदे कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वरुड (एनटीआर हायस्कूल) यांनी यंदाच्या इयत्ता दहावी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करत निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकूण निकाल तब्बल ९८.४४ टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



यंदाच्या परीक्षेसाठी शाळेतून एकुण १९३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे १३ विद्यार्थी आहेत. शाळेच्या उत्कृष्ट निकालामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षीच्या परीक्षेत शाळेचा विद्यार्थी संयम मनीष विटाळकर याने ९८.२० टक्के गुण प्राप्त करुन तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याच्या या दैदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सुयोग लीलाधर दंडाळे ९७.६० टक्के, ओमकार अजय मेहंदळे व आशिया अब्दुल नईम ९४ टक्के, उत्कर्षा प्रवीण पाटणकर ९३.८० टक्के, ईश्वरी विजय बगाडे ९३.२० टक्के, यश भरत घोरपडे ९२.८० टक्के, डिंपल परीक्षित भातुलकर ९२ टक्के, कु. सुयशा प्रकाश डोंगरे ९०.६० टक्के, अक्षय कृपाल बघेल व कृष्णाली विजय होले ९०.४० टक्के, आचल कृष्णा डबरासे व हर्ष संजय शिरभाते ९० टक्के मिळाले आहेत.

या यशाबद्दल नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर तसेच संस्थेच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापक योगेश बरडिया, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व परिश्रमपूर्वक अध्यापन करुन हे यश मिळवून दिल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल पालक वर्ग, माजी विद्यार्थी व परिसरातील नागरिकांकडूनही कौतुकाचा वर्षाव होत असून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संपादकीय

**{ एकाग्रता ही यशाची पहिली पायरी आहे }**

## महाराष्ट्राचा कौल: जनमताचा महाविस्फोट आणि नव्या राजकारणाची पहाट

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या अस्थिरतेच्या, फोडाफोडीच्या आणि सत्तासंघर्षाच्या नाट्यावर अखेर जनतेने आपला स्पष्ट आणि निर्णायक कौल दिला आहे. हा केवळ एका युतीचा विजय किंवा दुसऱ्या आघाडीचा पराभव नाही, तर हा महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला मिळालेली एक नवी दिशा आहे. विधानसभेच्या या निकालांनी राजकीय विश्लेषकांचे सर्व अंदाज धुळीस मिळवले असून, 'मराठी माणूस' काय विचार करतो, याचे एक अजब कोडे पुन्हा एकदा जगासमोर मांडले आहे. फोडाफोडीच्या राजकारणाला पूर्णविराम?

२०१९ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राने जे पाहिले, ते भारतीय लोकशाहीच्या इतिहासात अभूतपूर्व होते. अनपेक्षित आघाड्या, पहाटेचे शपथविधी, पक्षांतरे आणि थेट पक्षांची झालेली दोन शकले... या सगळ्यामुळे सामान्य मतदार चक्रावून गेला होता. 'माझा मतदानाचा अधिकार नेमका कोणासाठी?' असा प्रश्न सामान्यांच्या मनात होता. या निकालातून जनतेने हे स्पष्ट केले आहे की, त्यांना अस्थिरता नको आहे. ज्या पद्धतीने एका बाजूला महायुतीने (भाजपा, शिवसेना-शिंदे गट, राष्ट्रवादी-अजित पवार गट) बाजी मारली आहे, त्यावरून असे दिसते की जनतेने विकास आणि स्थिरतेला अधिक प्राधान्य दिले आहे.

कल्याणी योजनांचा करिष्मा: 'लाडकी बहीण' गेमचेंजर

या विजयाचे सर्वात मोठे श्रेय जर कशाला द्यायचे असेल, तर ते म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'. अर्थशास्त्राच्या भाषेत याला 'कल्याणकारी राजकारण' म्हटले जात असले, तरी प्रत्यक्ष निवडणुकीत हे 'मास्टरस्ट्रोक' ठरले. ग्रामीण भागातील महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान केंद्रावर जाऊन दिलेला कौल हा महायुतीच्या विजयाचा पाया ठरला. केवळ आश्वासने न देता, थेट बँक खात्यात पैसे जमा करण्याच्या तंत्राने मतदारांचा विश्वास संपादन करण्यात सरकार यशस्वी झाले. विभाजित पक्ष आणि नेतृत्वाची कसोटी शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये पडलेली फूट या निवडणुकीचा केंद्रबिंदू होती. 'खरी शिवसेना कोणाची?' आणि 'खरा राष्ट्रवादी पक्ष कोणाचा?' याचे उत्तर निवडणूक आयोगाने दिले असले, तरी जनतेच्या न्यायालयात काय निकाल लागतो, याकडे सर्वांचे लक्ष होते. निकालांवरून असे स्पष्ट होते की, चिन्हापेक्षा आणि नावापेक्षा 'कार्य' आणि 'सत्तेतील सहभाग' याला मतदारांनी महत्त्व दिले. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी भावनिक साद घालण्याचा प्रयत्न केला, परंतु महायुतीच्या यंत्रणेपुढे आणि रणनीतीपुढे ती काहीशी कमी पडली असे म्हणावे लागेल.

जातीय समीकरणे आणि ध्रुवीकरण या निवडणुकीत मराठा आरक्षण, ओबीसी राजकारण आणि 'बटेंगे तो कटेंगे' सारख्या घोषणांनी वातावरण तापवले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठवाड्यात महायुतीला फटका बसेल असे वाटत असताना, प्रत्यक्षात निकालांचे चित्र वेगळे दिसले. हिंदू मतांचे झालेले ध्रुवीकरण आणि सूक्ष्म नियोजनाद्वारे केलेली 'सोशल इंजिनिअरिंग' भाजपासाठी फायदेशीर ठरली.

विकासाच्या मुद्द्यावर जातीपातीचे राजकारण वरचढ ठरते की काय, ही भीती काही अंशी दूर झाली असली, तरी समाजात निर्माण झालेली दरी सांधणे हे नव्या सरकारपुढील मोठे आव्हान असेल.

# आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

खुल्या वर्गातील लोकांची (मुस्लिम धरून) लोकसंख्या अंदाजे २५ टक्के. म्हणजे, या २५ टक्के खुल्या वर्गातील लोकांना ९८ टक्के रोजगार उपलब्ध आहेत, तर ७५ टक्के बहुजनांना फक्त २ टक्के. मग आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

आरक्षणांतर्गत उपवर्गीकरणाच्या चर्चेने महाराष्ट्रात सध्या उग्र स्वरूप धारण केले. अनुसूचित जातीतल्या संख्येने मोठ्या असलेल्या दोन जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आणि बाजूने, विविध माध्यमांमध्ये एकमेकांवर अत्यंत त्वेषाने तुटून पडत आहेत. उपवर्गीकरणावरून भांडणाऱ्या या जातींना हे दाखवून देणे गरजेचे आहे की ते नक्की किती टक्क्यांसाठी आणि का भांडत आहेत. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाचा रोजगारातील खरा टक्का किती आहे ते समजून घेतले पाहिजे.




इथल्या जातिवादी व्यवस्थेने शतकानुशतके पशुपेक्षाही हीन असे अस्पृश्यतेचे जीवन ज्या लोकांवर लादले त्या महाराष्ट्रातील पूर्वास्पृश्य ५९ जातींना व्यवस्थेत प्रतिनिधित्व, संधी, न्याय देण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात, म्हणजे १३ टक्के आरक्षण संविधानाने लागू केले. हे आरक्षण फक्त सरकारी क्षेत्रातच उपलब्ध आहे. सरकारी क्षेत्रात आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार असलेल्या यंत्रणेवर कट्टर आरक्षण-विरोधकांचा ताबा राहिल्याने अनुसूचित जातींच्या (खरे तर आरक्षणाच्या सर्वच लाभधारक जातींच्या) लोकांसाठी असलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करताना त्यांचा दृष्टिकोन कायम पूर्वग्रहदूषित राहिलेला आहे. तसेच, शक्यतो या जागा भरल्याच जाऊ नयेत किंवा कमी भरल्या जाव्यात यासाठी त्यांच्या लटपटी चालू असतात, हे वेळोवेळी उजेडात आलेल्या बॅकलॉगच्या मोठ्या आकड्यांवरून लक्षात येते.

एकेकाळी रोजगाराच्या बाबतीत समृद्ध असलेले सरकारी क्षेत्र १९९१ साली आलेल्या 'खाउजा' धोरणामुळे आक्रसू लागले. २०१४ साली सत्तेत आलेल्या संघ पुरस्कृत भाजप सरकारने तर सरकारी उपक्रम, उद्योग विकण्याचा, सरकारी कामांचे कंत्राटीकरण, आऊटसोर्सिंग करण्याचा सपाटाच लावल्यामुळे हे क्षेत्र एवढे रोडावले आहे की सध्या या सरकारी क्षेत्रातील रोजगाराचा एकूण रोजगारात वाटा उरला आहे अंदाजे चार टक्के. उर्वरित ९६ टक्के रोजगार खासगी क्षेत्रात आहेत.

सरकारी क्षेत्रातील रोजगारांपैकी निम्मा म्हणजे ५० टक्के रोजगार आरक्षित (अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि अन्य) असतो, कारण सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा साहनी खटल्यातील निर्णयानुसार आरक्षणावर ५० टक्क्यांची मर्यादा घातलेली आहे. उर्वरित ५० टक्के रोजगार खुल्या वर्गासाठी असतो. याचा अर्थ, एकूण रोजगाराच्या तुलनेत या चार टक्के असलेल्या सरकारी रोजगारात दोन टक्के आरक्षित आणि दोन टक्के खुल्या प्रवर्गासाठी असे प्रमाण पडते. त्यात अनुसूचित जातींसाठी १३ टक्के आरक्षण आहे.

म्हणजे एकूण रोजगारात ५९ अनुसूचित जातींसाठी राखीव जागा आहेत फक्त ०.५२ टक्का. यावरून हे स्पष्ट होते की १३ टक्के लोकसंख्या असलेल्या अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देण्यासाठी रोजगार उपलब्ध आहे फक्त ०.५२ टक्के. मग साधे अंकगणित मांडले तर प्रश्न असा पडतो, हा सध्याचा ०.५२ टक्का रोजगार अनुसूचित जातींना त्यांच्या १३ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देतो का? हा आकडा एवढा कमी का? यातून आरक्षणाचा उद्देश कसा सफल होणार?

या सरकारी क्षेत्रातल्या आरक्षित जागांवर अनुसूचित जातींचे लोक येऊ नयेत म्हणून की काय, नोकर भरती जवळपास बंद किंवा अत्यल्प प्रमाणात होत असल्याने नवीन रोजगार फारसे उपलब्ध नाहीत. याशिवाय आरक्षण हा जुलमाचा रामराम वाटत असल्याने बऱ्याच आरक्षित जागा जाणीवपूर्वक रिक्त ठेवल्या जातात. त्यामुळे या जागांचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. म्हणून, प्रत्यक्षात ०.५२ टक्क्यापेक्षा कमीच रोजगार अनुसूचित जातींच्या लोकांना मिळालेला आहे असे म्हणता येते.

आरक्षण केवळ सरकारी क्षेत्रातच असल्याने हा ०.५२ टक्के आकडा लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकडा आहे. त्यामुळे आरक्षणाचा जो लाभ मिळतो तो पुरेसा असूच शकत नाही. मग खुल्या वर्गातील अनेक विचारवंतांना त्यांचा पुळका येतो आणि मग क्रिमिलेयर लावा, आरक्षणांतर्गत आरक्षण आणा, अशा सूचना ते करतात. त्यांना जर अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व द्यावे, संधी द्यावी, न्याय द्यावा असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर हे आरक्षण खासगी क्षेत्रातही लागू करा, अशी मागणी ते का करीत नाहीत? या जातींवर अस्पृश्यता लादून त्यांना पशुतुल्य जीवन देऊन शतकानुशतके त्यांचे शोषण करण्याचे पाप केले ते इथल्या जाती-आधारित भेदभावाचा उघड पुरस्कार करणाऱ्या धार्मिक व्यवस्थेने. मग वंचितांना प्रतिनिधित्व, संधी किंवा न्याय देण्याची जबाबदारी फक्त सरकारवर टाकणे आणि स्वतःची जबाबदारी झटकणे ही या व्यवस्थेतील जातिवादी लोकांची लबाडी आहे.

या सामाजिक पापाचे प्रायश्चित्त घेण्याऐवजी जातिवादी लोक आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या लोकांचा विविध माध्यमांतून दुष्प्रचार करून त्यांचा सतत तिरस्कार करत राहतात. यांच्यामुळे मेरीट मारले जाते, ३५ टक्केवाले 'सरकारचे जावई' साहेब बनतात आणि ९० टक्केवाले मागे पडतात, यांच्या इंजिनिअरने बांधलेले पूल कोसळतात, याच्या डॉक्टरच्या हातून पेशंट मरतात, आरक्षणामुळे देश बरबाद झाला, आमच्या संधी मारल्या.... अशा अर्थाचे निराधार विद्वेषी संदेश व्हायरल करून हा तिरस्कार आणि जातिवाद सतत तेवत ठेवतात. हद्द म्हणजे हा जातिभेद त्यांनी परदेशात देखील नेला आहे आणि कॅलिफोर्निया राज्यात जातिभेदविरोधी कायदा पारित करण्याची वेळ आणली आहे.

बरे, यांच्या रोजगाराच्या किती संधी पूर्वास्पृश्य लोकांनी मारल्या असाव्यात? वर वर्णन केल्याप्रमाणे केवळ ०.५२ टक्के. या मेरीटधारी वर्गासाठी ९६ टक्के रोजगार असलेले खासगी क्षेत्र उपलब्ध आहे. उर्वरित चार टक्के सरकारी क्षेत्रातील रोजगारातले निम्मे म्हणजे २ टक्के यांना उपलब्ध आहे. लॅटरल एंट्री आहे. असे एकूण रोजगारात ९८ टक्के रोजगार यांना उपलब्ध आहेत. आता लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर बहुजनांची लोकसंख्या (जात आधारित जनगणना न झाल्याने अंदाजे आकडे) अंदाजे ७५ टक्के आहे, तर खुल्या वर्गातील लोकांची (मुस्लिम धरून) लोकसंख्या अंदाजे २५ टक्के. म्हणजे, या २५ टक्के खुल्या वर्गातील लोकांना ९८ टक्के रोजगार उपलब्ध आहेत, तर ७५ टक्के बहुजनांना फक्त २ टक्के. मग आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

हे वास्तव खुल्या वर्गातील लोकांना माहिती असूनही आरक्षणविरोधात रान उठवले जाते, कारण बहुजन वर्ग लगेच प्रतिक्रियावादी बनून या दोन टक्के जागांचा बचाव आक्रमकपणे करतो आणि त्यातच गुंतून पडतो. हेच तर खुल्या वर्गातील लोकांना हवे आहे. तुम्ही दोन टक्क्यांत अडकून बसा आम्ही इकडे ९८ टक्क्यांचा उपभोग घेतो असे हे मायाजाल टाकलेले आहे.

हल्ली चर्चेत असलेले उपवर्गीकरण प्रकरण याच मायाजालाचा, फोडा आणि झोडा नीतीचा एक भाग आहे. उपवर्गीकरण चर्चा सुरू झाल्यापासून अनुसूचित जाती आपापसात त्वेषाने भांडत आहेत. कशासाठी? एकूण रोजगारातील ०.५२ टक्क्यांतील आपल्या वाट्याला किती येईल यासाठी. आपल्याला मुळात प्रतिनिधित्वच अत्यंत क्षुल्लक आहे, ते लोकसंख्येच्या प्रमाणात नसून आपल्याला गृहीत धरले जात आहे याचा त्यांना गंधही नाही.

विशेष बाब म्हणजे हे तिरस्काराचे धनी असलेले बहुजन बांधव हिंदूच आहेत. गेल्या दहाबारा वर्षांपासून धर्म प्रचंड 'धोक्यात' आल्याने तो वाचवण्यात हे बांधव गुंतलेले आहेत म्हणून आपल्या 'प्रतिनिधित्वाच्या खऱ्या टक्क्याचा' विचार करायला त्यांना वेळ नसावा.

# निकालानंतरचा कट्टा: स्वप्न आणि वास्तव

**स्थळ: शाळेच्या बाहेरील बाकडा**
**(निकाल लागल्यानंतरचे काही तास)**

**समीर:** (उत्सुकतेने) अरे राहुल, काय झाला निकाल? मी तुझा नंबर शोधत होतो, पण नेट खूप स्लो होतं.

**राहुल:** (थोड्या शांत सुरात) अरे, मला ७०% मिळालेत. घरच्यांना वाटतंय थोडे कमीच आहेत, पण माझं गणित कच्चं होतं ना, त्यामुळे मी समाधानी आहे. तुझं काय? तुझं तर नक्कीच ९० च्या पुढे असणार!

**समीर:** हो रे, नशीब बलवत्तर होतं, ९२% पडले. पण आता घरचे म्हणतायत सायन्सलाच प्रवेश घे. मला मात्र फोटोग्राफी आणि डिझायनिंगमध्ये रस आहे. टक्केवारी जास्त आली की लोकांच्या अपेक्षांचं ओझं वाढतं, हेच खरं.

**सानिका:** (तिथे येत) बरोबर बोलला समीर. मला ८५% मिळालेत. माझे बाबा खूश आहेत, पण आईला वाटतंय की अजून ५% हवे होते. आता चर्चा सुरू झालीये की कॉलेज कोणतं मिळणार? घरा जवळचं की नामांकित?

**राहुल:** तुमचं बरं आहे, तुम्हाला हवं ते कॉलेज मिळेल. मला मात्र 'कट-ऑफ'ची भीती वाटतेय. पण एक सांगू का, १० वी म्हणजे फक्त सुरुवात आहे. माझे काका नेहमी म्हणतात, मार्कशीट फक्त एका दिवसासाठी असते, आयुष्य घडवण्यासाठी कौशल्य लागतं.

**समीर:** अगदी पटलं तुझं बोलणं! सानिका, तू काय ठरवलंयस? आर्ट्स की कॉमर्स?

**सानिका:** मला सायकोलॉजी आवडतं, म्हणून मी 'आर्ट्स' घेणार आहे. भलेही मला चांगले मार्क्स आहेत, तरीही मी गर्दीच्या मागे धावणार नाही. समीर, तू पण घरच्यांशी बोलून घे. ९२% आहेत म्हणून आवडीचा बळी देऊ नकोस.




**राहुल:** चला तर मग, आता टेन्शन संपलंय. आता खरी मजा सुरू होईल ती कॉलेज लाइफची! पण त्याआधी पार्टी तर झालीच पाहिजे!

**समीर आणि सानिका:** (हसून) हो, नक्कीच!

**थोडक्यात सारांश:**

हा निकाल केवळ कागदावरचे आकडे नसून विद्यार्थ्यांच्या भविष्यातील निर्णयांची पहिली पायरी असते. टक्केवारी कितीही असो, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार क्षेत्र निवडणे आणि पालकांनी त्यांना पाठिंबा देणे हीच काळाची गरज आहे.

# महाराष्ट्राची जीवनवाहिनी: आपली एसटी

'लाल परी' म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळाची बस केवळ एक वाहन नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन धावणारी ही बस खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची जीवनवाहिनी ठरली आहे. इतिहास आणि व्याप्ती १ जून १९४८ रोजी पुणे ते अहमदनगर या मार्गावर पहिली एसटी बस धावली. तेव्हापासून सुरू झालेला हा प्रवास आज राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. मग ते कोकणचे नागमोडी रस्ते असोत, सह्याद्रीचे घाट असोत किंवा विदर्भाचे ऊन; एसटी प्रत्येक ठिकाणी खंबीरपणे उभी असते. आज महामंडळाकडे हजारो बसेसचा ताफा असून लाखो प्रवासी दररोज यातून प्रवास करतात.



विविध रूपे आणि सोयी काळाप्रमाणे एसटीने आपले रूप बदलले आहे. साध्या लाल बसपासून सुरू झालेला हा प्रवास आता प्रगत टप्प्यावर आहे: लाल परी/परिवर्तन: ग्रामीण भागाचा कणा. हिरकणी (निमआराम): लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सोयीस्कर. शिवनेरी । शिवशाही: आरामदायी आणि वातानुकूलित प्रवासासाठी प्रसिद्ध. ई-बस (शिवाई): पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सुरू झालेली विद्युत बस.

ग्रामीण जीवनाचा आधार शहरांमध्ये प्रवासाचे अनेक पर्याय उपलब्ध असतात, पण ग्रामीण महाराष्ट्रासाठी एसटी हा एकमेव आधार आहे. शाळेत जाणारे विद्यार्थी, बाजारात जाणारा शेतकरी किंवा कामावर जाणारा कष्टकरी वर्गङ्कसगळ्यांसाठी एसटी ही हक्काची सोबती आहे. विशेषतः महिलांसाठी सवलतीचे पास आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या योजनांमुळे एसटीचा प्रवास अधिक सर्वसमावेशक झाला आहे.

आव्हाने आणि महत्त्व आज खाजगी वाहने आणि इतर पर्यायांमुळे एसटीसमोर मोठी आव्हाने आहेत. तरीही, सुरक्षितता आणि विश्वासाच्या बाबतीत एसटीचा क्रमांक पहिला लागतो. एसटीचा चालक आणि वाहक (कंडक्टर) हे प्रवाशांच्या सुख-दुःखाचे साक्षीदार असतात.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# चिखलदरा तालुक्यातील विकासकामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

## मडकी येथे पर्यटन विकासासह जलसंधारणावर भर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**अमरावती** – जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चिखलदरा तालुक्यातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. नुकत्याच झालेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी सुरू असलेल्या कामांचा दर्जा तपासून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. मडकी (ता.चिखलदरा) येथे जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपाययोजना अंतर्गत सुरू असलेल्या सिमेंट नाला बांधकामाची पाहणी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केली. यावेळी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या विहीर व पाण्याच्या टाकीची तसेच अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांची सविस्तर माहिती घेतली. मडकी येथील भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. जलसंधारणाची कामे केवळ पाणी साठवण्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यांचा उपयोग पर्यटन वाढीसाठी आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी करावा, जेणेकरून पर्यटकांना आकर्षित करून स्थानिक रोजगार वाढवता येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी मौजे कोहाणा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरू असलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या कामाचीही पाहणी करण्यात आली. हे काम तांत्रिक निकषांनुसार आणि दर्जेदार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले की, सर्व विकासकामे ही नियोजनबद्ध आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन असावीत. जलसंधारणाच्या दर्जेदार कामांमुळे भूजल पातळीत वाढ होऊन त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना सिंचनासाठी होईल. पाणीटंचाई दूर करण्यासोबतच ही ठिकाणे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाल्यास परिसराचा आर्थिक कायापालट होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अभियंता व कर्मचारी उपस्थित होते.

# बाळासाहेबांवर लवकरच टपाल तिकीट

## राहुल शेवाळे यांच्या मागणीची केंद्राकडून दखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष टपाल तिकीट जारी करून भारतीय टपाल विभागाकडून अनोखी आदरांजली दिली जाणार आहे. या संदर्भात शिवसेना सरचिटणीस, माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केलेल्या मागणीची दखल भारतीय टपाल विभागाने घेतली असून लवकरच यावर सकारात्मक निर्णय घेतला जाणार आहे. या मागणीबाबत केंद्र सरकारकडून नुकतेच एक पत्र प्राप्त झाल्याची माहिती शेवाळे यांच्याकडून देण्यात आली. भारतीय टपाल विभागातील उपमहासंचालक कार्यालयाकडून शेवाळे यांना प्राप्त झालेल्या पत्रात लिहिले आहे की, फिलाटेल (संग्रह) विभागाच्या सल्लागार समितीच्या आगामी बैठकीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकीट जारी करण्याबाबत चर्चा करण्यात येईल.जानेवारी महिन्यात केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना दिलेल्या लेखी निवेदनात शेवाळे यांनी म्हटले की, २७ जानेवारीला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची १०० वी जयंती देशभरात मोठ्या आनंदाने साजरी करण्यात आली.

## जनता हायस्कूलच्या मुलांनी

# दहावी बोर्ड परीक्षेत मारली बाजी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेचा जनता हायस्कूलचा निकाल ९०.७२ टक्के लागला आहे.

जीवन हरिश्चंद्र रडके ९२.४० टक्के प्रथम, कौस्तुभ जयकुमार टाकरखेडे ९२ टक्के द्वितीय तर अथर्व श्रीधर खासबागे ९१ टक्के घेऊन शाळेमधुन तृतीय आलेला आहे. वरील सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, वर्गशिक्षक योगेश फुटाणे, प्रविण आकोटकर व मार्गदर्शक शिक्षक यांचे हार्दिक अभिनंदन जनता शिक्षण संस्थाध्यक्ष जगदिश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे, सतिश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, ज्येष्ठ संचालक अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे, अ‍ॅड.प्रभाकर सावरकर, प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, प्रा.प्रदिप काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले असून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## इयत्ता दहावीच्या परिक्षेत

# वसंतराव नाईक हायस्कूलचा ९७.१४ टक्के निकाल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथुन जवळच असलेल्या जरुड येथील उत्क्रांती शिक्षण संस्था व्दारा संचालित वसंतराव नाईक हायस्कूलचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परिक्षेचा निकाल ९७.१४ टक्के लागला असून या हायस्कूलची गौरी संजय पोकळे ही तालुक्यातून तृतीय आली आहे. या परिक्षेत गौरी संजय पोकळे हिला ९७.१४ टक्के, सभ्यता सतिश वसुले ९५ टक्के, लसिका संजय गायकी ९३.२० टक्के, पलक सतिश लांडे व वेदिका किशोर राऊत ९१.८० टक्के, श्रेयश सुधिर दवंडे ९१.६० टक्के, पायल ललितकुमार आजनकर ९० टक्के, स्वरा विजय अंबाडकर व स्वरा योगेश तुमराम ९०.६० टक्के तर श्रेया धर्मेंद्र राईकवार हिने ९० टक्के गुण प्राप्त केले आहे.

या परिक्षेला एकूण २४५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यश प्राप्त केलेले विद्यार्थी त्यांच्या यशाचे श्रेय उत्क्रांती शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, मार्गदर्शक शिक्षक व आईवडिलांना देतात.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# 'भाजपने भ्रष्टाचाऱ्यांना सत्ता देण्याची परंपरा राखली' : बंगालमध्ये शुभेंदू अधिकारींच्या निवडीवरून संजय राऊतांचा घणाघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – पश्चिम बंगालमध्ये भाजपला ऐतिहासिक विजय मिळवून देणारे आणि ममता बॅनर्जी यांचा गड उद्ध्वस्त करणारे भाजप नेते शुभेंदू अधिकारी हे आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी या निर्णयाची अधिकृत घोषणा केली आहे. त्यामुळे बंगालच्या इतिहासात भाजपचा पहिला मुख्यमंत्री आज विराजमान होणार आहे. यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केलाय. संजय राऊत म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने अत्यंत भ्रष्ट अशा व्यक्तीला मुख्यमंत्रीपदी बसवण्याची आपली परंपरा कायम राखली आहे. २०२० च्या दरम्यान एक स्टिंग ऑपरेशन झाले होते आणि तृणमूल काँग्रेसच्या पाच खासदारांना ऑन कॅमेरा पैसे स्वीकारताना दाखवण्यात आले. त्यात शुभेंदू अधिकारी होते. त्यानंतर शुभेंदू अधिकारी यांच्यावर ईडीच्या आणि अँटी करप्शनच्या धाडी केंद्राने टाकल्या. त्या धाडी टाकायला सुरुवात झाल्यावर शुभेंदू अधिकारी हे भाजपमध्ये सामील झाले आणि आज ते मुख्यमंत्री झाले. शुभेंदू अधिकारी हे अजूनही वॉशिंग मशीनमध्येच फिरत आहेत. तो डाग अजूनही स्वच्छ झालेला नाही. पण, अशा माणसाला मुख्यमंत्रीपद देऊन भाजपने भ्रष्टाचारांना सत्ता देण्याची आपली परंपरा राखली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन, असे हल्लाबोल त्यांनी केलाय. महाराष्ट्र सरकारने २५४ एकर जमीन दोन बिल्डर्सला दिली दरम्यान, महाराष्ट्र सरकारने २५४ एकर जमीन दोन बिल्डर्सला दिल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. बिल्डर्सला दिलेली जमीन काहीही करून काहीही करून परत ताब्यात मिळावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. मीरा रियल इस्टेट, स्टेट इन्वेस्टमेंटचे मालक कोण आहेत? असा प्रश्न देखील राऊत यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्र सरकारकडे मोठमोठे वकील आहेत, तरीदेखील सरकारने खटला हरला. सरकार मुद्दामून हरलं का? असा संशय देखील त्यांनी व्यक्त केला आहे. संजय राऊत म्हणाले की, मीरा भाईंदरमध्ये २५४ एकर सरकारी जमीन देण्यात आली. कोट्यावधीची जमीन उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे खाजगी व्यक्तीला देण्यात आली. सरकारने आव्हान देण्याचे ठरवले आहे.

## शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलचा

# बोर्डाच्या दहावीचा निकाल १०० टक्के

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – विदर्भ प्रगती सहयोगी संस्था अमरावती द्वारा संचालित नामांकित शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलचा इयत्ता १० वी बोर्डाचा निकाल १०० टक्के लागुन दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या निकालामुळे सर्वत्र विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक होत आहे. या परीक्षेत विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक नताशा प्रमोद उघडे ९०.८० टक्के, द्वितीय ओमेरा अमीन खान पठाण ८७.२० टक्के, तृतीय नंदिनी दिनेश नागले ८६ टक्के तर चतुर्थ क्रमांक अलिना परवीन शेख ८३.२० टक्के आणि पाचवा क्रमांक भावेश सुधाकर मस्की ८१.२० टक्के, रोहित बबन इंगळे ८०.८० टक्के पटकाविला आहे.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील उच्च शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालाचे श्रेय मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला देण्यात आले आहे. शैक्षणिक दर्जामुळे विद्यालयाचा निकाल उंचावल्याने परिसरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आरटीई २५% प्रवेश प्रक्रिया अंतर्गत

# पंचायत समिती वरुड येथे प्रभावी अंमलबजावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – गुरुवार दि. ७ मे २०२६ रोजी आरटीई २५% प्रवेश प्रक्रिया संदर्भात तालुकास्तरीय कागदपत्रे पडताळणी समितीची अंतिम आढावा सभा गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव शरद कुकडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या सभेत प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता व अचूकता राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आरटीई प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी वरुड येथील काही पालक व प्रतिष्ठित नागरिकांनी प्रवेश प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने राबविले असल्याची तक्रार केली होती.

गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यानी तक्रारीची तात्काळ दखल घेत पालकांच्या भाडेपट्टी तपासणी करिता त्रीसदसयीय स्वतंत्र तीन पथकांची निर्मिती करून दोन टप्प्यात प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणी प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली. पालकांच्या आलेल्या तक्रारीवर सुनावणी प्रक्रिया प्रभावीपणे राबवण्यात आली. सुनावणी दरम्यान भाडेकरारबाबत भाडेतत्त्वावर राहत असलेले भाडेकरू व घरमालक या दोघांनाही सुनावणीस हजर राहण्यास सुचित करण्यात आले. त्या अनुषंगाने आढावा व चर्चा करण्यासाठी ७ मे ला बोल-ावण्यात आलेल्या पडताळणी समितीच्या सभेसमोर वृत्तांत अंतिम स्वरूपात मांडण्यात आले. अर्जदारांनी सादर केलेल्या उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचा दाखला, राहण्याचा पुरावा, जन्मदाखला इत्यादी कागदपत्रांची अचूक तपासणी पारदर्शकपणे पडताळणी समिती समक्ष करण्यात आली.

आरटीई २५% २०२६ २७ प्रवेश प्रक्रिया अंतर्गत तालुक्यातून एकूण २५१ ऑनलाइन अर्ज भरलेले असून यातील एकूण २१५ अर्ज प्रवेशित असून अप्राप्त अर्ज संख्या ३१ आहे. रद्द ठरवलेले व इतर कारणे असलेली अर्ज संख्या ३ असून प्रलंबित २ अर्ज आहेत ज्या घरभाडे करार खोटे असल्याचे सिद्ध झाले त्यांचे लेखी खुलासा घेऊन प्रवेश रद्द केल्याचे पडताळणी समितीसमोर सांगण्यात आले. दि.९ मे २०२६ ला ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल त्यानंतर यासंदर्भात कोणाचीही कुठलीही तक्रार ऐकून घेण्यास ही समिती बांधील नसेल. आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी सांगितले. कुठल्याही पालकावर अन्याय होणार नाही यासाठी अतिशय जबाबदारीने व पारदर्शकपणे पडताळणी समिती कार्य करत असल्याचे म्हटले. सभेला पडताळणी समितीतील सदस्य मुख्याध्यापिका माधुरी भोंडे, विजय आडे, नितीन ठाकरे, अरविंद वानखडे, सुधीर कांबळे, रंजन कुमार राठोड, भगवंत गजभिये, कुमारी एम एस डाबरे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

# सुरज बोर्डात चमकला : १० वीच्या परीक्षेत पठ्ठ्याला ३५ टक्के गुण

## आई-वडिल खुश, ग्रामस्थांकडून सत्कार




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – राज्यात एकीकडे १० वीच्या परीक्षेत १०० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचं कौतुक होत असून डिजिटल बॅनर आणि सोशल मीडियातही हे विद्यार्थी झळकत आहेत. मात्र, दुसरीकडे सोला-पूर जिल्ह्यात काठावर पास झालेल्या एका विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आलाय. यंदाच्या वर्षी निकाल कमी लागला असला तरी शंभर टक्के गुण घेणारे राज्यभरात शेकडो विद्यार्थी समोर आले आहेत. मात्र, प्रत्येक विषयात करेक्ट ३५ मार्क घेणारा पठ्ठ्या विठुरायाच्या पंढरीत पाहायला मिळाला. त्याच्या या ३५ टक्के गुणांवरही तो आनंदी असून त्याचे पालकही खुश आहेत. त्यामुळे, सुरजप्रमाणेच कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता आपल्या आयुष्याची पुढील दिशा ठरवली पाहिजे.

पंढरपूर तालुक्यातील बोहाळी येथे दहावीत शिकणारा सुरज आप्पासो मलपे याला सर्व विषयात करेक्ट ३५ मार्क मिळाले आहेत. सूरजची घरची परिस्थिती बेताचीच असून आई मजुरीला जाते तर वडीलही मिळेल ते काम करतात. त्यामुळे, सूरजला देखील आई-वडिलांना कामासाठी मदत करतच शिकावे लागले, सूरजने अभ्यासासोबत घरच्यांना मदत म्हणून दूध व्यवसाय करत दहावीची परीक्षा दिली होती. शुक्रवारी दुपारी निकाल जाहीर झाल्यानंतर सूरजने घेतलेल्या कष्टाला योग्य फळ मिळाल्याची भावना त्याच्या कुटुंबीयांची आहे. सर्वच विषयात बरोबर ३५ टक्के मार्क घेऊन सुरज दहावी पास झाला आहे. विशेष म्हणजे, सुरज दहावी पास झाल्यानंतर ग्रामस्थांनी, आई-वडिलांनी त्याला पुष्पहार घालून आणि पेढे वाटून आनंद व्यक्त केला आहे.

# ईडीची पंजाबच्या उद्योगमंत्र्यांवर पुन्हा धाड : दिल्ली-चंदीगडमध्ये एकाचवेळी छापेमारी, राजकारण तापलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**चंदीगड** – पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा पुन्हा एकदा अंमलबजावणी संचालनालयाच्या म्हणजेच ईडीच्या रडारवर आले आहेत.

शनिवारी सकाळी ईडीच्या पथकांनी दिल्ली आणि चंदीगडमधील त्यांच्या विविध ठिकाणांवर एकाचवेळी छापेमारी केली. गेल्या महिन्यात तिसऱ्यांदा झालेल्या या कारवाईमुळे पंजाबच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. ईडीच्या अधिकाऱ्यांनी चंदीगडमधील मंत्री अरोरा यांचे अधिकृत निवासस्थान, कार्यालय तसेच हॅम्पटन स्काय रिॲल्टी लिमिटेडशी संबंधित ठिकाणी तपास मोहीम राबवली. सकाळपासूनच अनेक वाहनांतून पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण परिसराचा ताबा घेत कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे तपासण्यास सुरुवात केली. याआधी १७ एप्रिल रोजीदेखील ईडीने परकीय चलन उल्लंघन प्रकरणात अरोरा यांच्याशी संबंधित विविध ठिकाणांवर धाडी टाकल्या होत्या. आता मोहालीतील खरड परिसरात कथित लायझन एजंट नितीन गोहल यांच्या निवासस्थानी झालेल्या कारवाईनंतर या तपासाला आणखी वेग आला आहे.

१०० कोटींच्या मनी लॉन्ड्रिंगचा संशय: ईडीच्या प्राथमिक तपासानुसार, संजीव अरोरा यांच्या कंपनीमार्फत १०० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे कथित मनी लॉन्ड्रिंग करण्यात आल्याचा संशय आहे. मोबाईल फोनच्या बनावट खरेदी-विक्री आणि निर्यातीच्या व्यवहारांद्वारे दुबईमार्गे पैसा भारतात परत आणल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. या प्रकाराला 'राऊंड ट्रिपिंग' असे म्हटले जाते. तपास यंत्रणांच्या मते, दिल्लीतील अनेक बनावट कंपन्यांच्या नावावरून जीएसटी बिले तयार करण्यात आली. त्याद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिट, जीएसटी रिफंड आणि ड्युटी ड्रॉबॅकचा गैरफायदा घेत सरकारी महसुलाला मोठा फटका देण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे.

सध्या ईडीची तपास मोहीम सुरू असून येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**नोकरी**

मिहान, ऑफिस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६
७८८८०६९४५५

# लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी देशाचे नवे सीडीएस : व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांच्याकडे नौदलाची धुरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – भारत सरकारने शनिवारी (दि.९) लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी (सेवानिवृत्त) यांची भारताचे पुढील चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ म्हणून नियुक्ती जाहीर केली. तसेच व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांची पुढील नौदलप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

अधिकृत घोषणेनुसार, लेफ्टनंट जनरल राजा सुब्रमणी हे पदभार स्वीकारल्यानंतर संरक्षण व्यवहार विभागात भारत सरकारचे सचिव म्हणूनही काम पाहणार आहेत. सध्याचे सीडीएस अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे २०२६ रोजी पूर्ण होणार आहे.

राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात महत्त्वाची जबाबदारी लेफ्टनंट जनरल राजा सुब्रमणी सप्टेंबर २०२५ पासून नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल सेक्रेटरिएटमध्ये मिलिटरी ॲडव्हायझर म्हणून कार्यरत आहेत. त्याआधी त्यांनी जुलै २०२४ ते जुलै २०२५ दरम्यान उपलष्करप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

सेंट्रल कमांडचे प्रमुख म्हणूनही अनुभव मार्च २०२३ ते जून २०२४ दरम्यान त्यांनी सेंट्रल कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ म्हणूनही काम पाहिले. भारत संयुक्त लष्करी समन्वय, थिएटर कमांड्स आणि सशस्त्र दलांचे आधुनिकीकरण यावर भर देत असताना त्यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

# विकास लवांडे यांच्यावरील हल्ल्यावरुन राष्ट्रवादीतच दोन मतप्रवाह : अमोल मिटकरींकडून हल्ल्याचा निषेध, प्रवक्ते सूरज चव्हाणांकडून बोगस वारकरी म्हणून उल्लेख

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर काही व्यक्तींनी शाई फेकत त्यांना धमकावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वारकरी संप्रदायातील आणि गोरक्षक असलेल्या तरुणांनी आपल्यावर हा जीवघेणा हल्ला केला असल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला आहे. या हल्लेखोरांकडं पिस्तूलही होते, असा दावा त्यांनी केला आहे. या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांसह इतर पक्षातील नेत्यांनी या घटनेबाबत संताप व्यक्त केली आहे. अशातच या शाहीफेक संदर्भात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दुसरीकडे या प्रकरणाने राज्याचे राजकारण तापलं असतांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात विकास लवांडे यांच्यावरील हल्ल्यावरून दोन मतप्रवाह बघायला मिळालं आहे. माजी आमदार अमोल मिटकरी यांच्याकडून हल्ल्याचा निषेध करण्यात आला आहे. तर राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांचाकडून लवांडे यांचा बोगस वारकरी म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. राष्ट्रवादीचे माजी आमदार अमोल मिटकरी यांच्याकडून हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या संदर्भात त्यांनी पोस्ट करत मिटकरींनी म्हटलं की, 'राष्ट्रवादी कांग्रेस अशा शब्दात त्यांनी या प्रकरणावर भाष्य केलं आहे.

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३५/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शशिकला मनोहरराव फुलेकर, वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी, २) सचिन मनोहरराव फुलेकर, वय अं.३६ वर्ष, धंदा- नोकरी, क्र.१ व २ रा.पिंपळगांव (राऊत), ता.नरखेड, जि.नागपूर, ३) चिन्मय बाबूलाल उर्फ बबलू फुलेकर, वय अं.१६ वर्ष, धंदा- शिक्षण, (अर्जदार क्र.२ हा स्वत:करीता व अ.पा.कका म्हणून अर्जदार क्र.३ करीता) रा.वार्ड क्र.२, बाहदा, पो.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.पिंपळगांव (राऊत), ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रायभान सिताराम फुलेकर, रा.बाहदा, पो.इसंबरी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०७/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४०२/२०२६** **ने.ता.१६/०६/२०२६**

**अर्जदार :-**

१) सौ.सुनिता दिवाकर डोंगरे, वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती

२) दिवाकर राम डोंगरे, वय अं.६४ वर्ष, धंदा- शेती

दोन्ही रा.वार्ड नं.२, पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत आकाश दिवाकर डोंगरे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२९१/२०२६** **ने.ता.०८/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) किशोर सुभाषराव बारमासे, वय अं.३९ वर्ष, धंदा-शेती, २) सौ.मनिषा किशोर सातपुते, वय अं.४४ वर्ष, धंदा- गृहिणी, क्र.१ व २ रा.वार्ड नं.६, बेनोडा, ३) सौ.मिनाक्षी किशोर दंडाळे, वय अं.४१ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.फ्लॅट नं.१०६, बी विंग, रिव्हर व्ह्यु, दनगट पाटील नगर, पुणे, ता.जि.पुणे, ४) सुभाषराव देवराव बारमासे, वय अं.६७ वर्ष, धंदा- शेती, रा.वार्ड नं.६.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुमनबाई सुभाषराव बारमासे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२९/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३६/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) खैरुंनिसा शकील खान, वय अं.५४ वर्ष, धंदा-गृहिणी, २) इकबाल खान शकील खान पठाण, वय अं.३२ वर्ष, धंदा- शेती, ३) इम्रानखान शकीलखान पठाण, वय अं.३० वर्ष, धंदा- शेती, ४) आसिफ खान शकील खान पठाण, वय अं.२८ वर्ष, धंदा- शेती, ५) शाहरुक शकीलखान पठाण, वय अं.२६ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ५ रा.आंबेडकर चौक, वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शकील खा हस्ते खा, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परिक्षेत

# इयत्ता १० वीच्या परिक्षेत एन.टी.आर.हायस्कूलचा संयम तालुक्यातून प्रथम

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परिक्षेचा वरुड तालुक्याचा निकाल ८९.४४ टक्के लागला असून एकूण ७ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. शहरातील एन.टी.आर.हायस्कूलचा विद्यार्थी संयम मनिष विटाळकर याने ९८.२० टक्के गुण घेवुन तालुक्यातून प्रथम, याच शाळेचा सुयोग लिलाधर दंडाळे व्दितीय, जरुडच्या वसंतराव नाईक हायस्कूलची गौरी संजय पोकळे ही ९७.६० टक्के गुण घेवुन तृतीय, स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाचा विद्यार्थी सौम्य सागर खंडेलवाल हिने ९७ टक्के गुण घेवुन चतुर्थ, याच शाळेची अक्षदा निळकंठ बेंडे हिने ९५.६० टक्के गुण घेवुन तालुक्यातुन पाचवी तर अदिती विजय लांडे हिने ९५ टक्के गुण घेत तालुक्यातून सहावा येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.

चांदस (वाठोडा) येथील आर.जी.देशमुख कृषी विद्यालयाचा निकाल ८४.९३ टक्के, लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक हायस्कुलचा निकाल ९४.८७ टक्के, पार्वताबाई धर्माधिकारी शाळा, वरुड ८१.२५ टक्के, जरुड हायस्कुल जरुड ८६.३६ टक्के, प्रभात हायस्कुल पुसला ८०.५५ टक्के, शहीद स्मृती विद्यालय बेनोडा ८८.७३ टक्के, श्रीमती गंगुबाई ठाकरे स्मृती विद्यालय हातुर्णा ९४.५४ टक्के, राजुरा हायस्कुल राजुरा बाजार ७९.३१ टक्के, जनता गर्ल्स हायस्कुल शेंदुरजनाघाट ९३.२२ टक्के, बाळासाहेब देशमुख कन्या शाळा जरूड ६१.७६ टक्के, उर्दू हायस्कुल वरुड १०० टक्के, श्री.यशवंतबाबा विद्यालय पवनी (स.) ८४.३७ टक्के, स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरुड ९८.४ टक्के, श्री.मल्हाररावजी माहुलकर विद्यालय टेंभुरखेडा ७१.४२ टक्के, न्यु इंग्लिश हायस्कुल वरुड ७४.२८ टक्के, जनता माध्यमिक व एन.जी.मोघे हायस्कुल शेंदुरजनाघाट ९०.७२ टक्के, विकास उर्दू हायस्कुल शेंदुरजनाघाट १०० टक्के, जि.प.हायस्कूल जामगांव ० टक्के, विद्यानिकेतन हायस्कूल आमनेर ७५ टक्के, जागृत विद्यालय एकदरा ९५.२३ टक्के, पी.व्ही.साबळे जागृत विद्यालय सुरळी ८१.२५ टक्के, माध्यमिक विद्यालय, लोणी ८२.३५ टक्के, वसंतराव नाईक हायस्कुल जरुड ९७.१४ टक्के, सर्वोदय प्रगती माध्यमिक विद्यालय करजगांव ८८.५७ टक्के, केशवराव लांडे माध्यमिक विद्यालय बेनोडा ० टक्के, श्रीमती एम.मानकर कन्या विद्यालय राजुरा बाजार ६० टक्के, स्व.दौलतराव भगवानजी शेळके महाविद्यालय लिंगा ८५.७१ टक्के, जानकीदेवी गांधी कन्या विद्यालय वरूड ७२.७२ टक्के, अभिमानजी काळमेंघ हायस्कुल मांगरुळी पेठ ८९.२८ टक्के, महात्मा फुले माध्यमिक विद्यालय धनोडी ८७.०९ टक्के, स्व.केशवरावजी क्षिरसागर जागृत कन्या शाळा लोणी ९२.५० टक्के, डॉ.अमोल वैद्य स्मृती जागृत विद्यालय सावंगी ९५ टक्के, श्रीमती इंदिरा गांधी स्मृती विद्यालय मलकापुर ८० टक्के, स्व.नामदेवराव तूकारामजी रडके हायस्कूल वरुड ९८.४४ टक्के, विद्यासागर विद्यालय वाडेगांव ९१.६६ टक्के, स्व.श्री.श्रावणजी फरकाडे कन्या विद्यालय बेनोडा शहीद ८३.३३ टक्के, श्री दादाजी धुनीवाले हायस्कुल वाई खुर्द ७२.७२ टक्के, आप्पासाहेब देशमुख विद्यालय वरुड ६५ टक्के, स्व.वामनराव मानकर हायस्कूल उदापूर ९२.५० टक्के, ज्ञानमाता विद्यालय रोषनखेडा ८२.३५ टक्के, अमडापुर विद्यालय अमडापुर ७८.२६ टक्के, जिजामाता विद्यालय, पुसला ९६.२२ टक्के, नानासाहेब कराळे विद्यालय, गणेशपुर ८६.९५ टक्के, गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट ३९.३९, डॉ.माधवराव पानसे विद्यालय वरुड ७६.४७ टक्के, श्रीमती राईबाई डोमाजी सोनारे विद्यालय वघाळ ७६.९२ टक्के, एच.के.एम.उर्दू हायस्कूल वरुड १०० टक्के, शासकीय आश्रमशाळा माणिकपुर ९०.६२ टक्के, सरस्वताबाई पंजाबराव ठाकरे विद्यालय हातूर्णा ७३.९१ टक्के, स्व.बी.एल.पाटील विद्यालय गव्हाणकुंड ७६.१९ टक्के, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा वाई खुर्द ८५.७१ टक्के, शांतीनिकेतन इंग्रजी शाळा वरुड १०० टक्के, बिरसामुंडा आदिवासी आश्रमशाळा वरुड ८४.२१ टक्के, जय भवानी आदिवासी आश्रमशाळा पुसला ८९.६५ टक्के, शासकीय आश्रमशाळा बेनोडा (शहीद) ९४.७३ टक्के तर न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कुल बेनोडा (शहीद) चा निकाल १०० टक्के, डॉ.मिना बंदे आदर्श इंग्लिश स्कुल वरुडचा निकाल १०० टक्के, मजने खान मेमोरिअल इंग्लिश स्कूल वरुडचा निकाल १०० टक्के लागला आहे.

यावर्षी या परीक्षेकरीता तालुक्यातून एकूण २ हजार ७७६ विद्यार्थी परीक्षेला हजर होते पैकी २ हजार ४८३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्तीर्ण विद्यार्थीनींची संख्या अधिक आहे. यावर्षी १०० टक्के निकाल लागणाऱ्या शाळांची संख्या ७ एवढी आहे तर सर्वात कमी म्हणजे ० टक्के निकाल बेनोडा येथील केशवराव लांडे माध्यमिक विद्यालय व जि.प.हायस्कूल जामगांवचा लागला आहे. उर्दू हायस्कूल वरुड, विकास उर्दू हायस्कूल शेंदुरजनाघाट, एच.के.एम.उर्दू हायस्कूल वरुड, शांतीनिकेतन इंग्लिश स्कूल वरुड, न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल बेनोडा (शहीद), डॉ.मिना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल वरुड मजने खान मेमोरिअल इंग्लिश स्कूल वरुडचा निकाल १०० टक्के लागला आहे.






# मायबाप सरकार, लाडक्या बहिणी तुमच्या मग निराधार दिव्यांगाना विना आधार का सोडता?

### नागपुरात मुख्यमंत्री सचिवालय गाठत नेत्रहीन दिव्यांगांचा सरकारला सवाल

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




***नागपुर*** – मायबाप सरकार! लाडक्या बहिणी खरंच तुमच्या लाडक्या आहेत, मात्र निराधार दिव्यांगाना असे विना आधार का सोडले? असा प्रश्न सरकारला विचारात नेत्रहीन दिव्यांगी नागपुरात मुख्यमंत्री सचिवालय गाठलंय. संजय गांधी निराधार योजनतील अडीच हजारांचे अनुदान गेले काही महिने अनियमितपणे मिळत असल्यामुळे आर्थिक अडचण होत असलेल्या नेत्रहीनांनी सरकारला हा सवाल करत मुख्यमंत्र्यांचे कार्यालय गाठलं आहे. तीन महिने निराधार दिव्यांगांना अनुदान न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणी, नेत्रहीनांची स्थिती विदारक राज्य सरकारकडून पात्र दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दर महिन्याला अडीच हजार रुपये अनुदान दिले जाते. मात्र राज्यभरातील हजारो दिव्यांगांना फेब्रुवारी महिन्यापासून संजय गांधी निराधार योजनेचे अडीच हजार रुपयांचे त्यांचे हक्काचे अनुदान मिळालेले नाही. फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल असे सलग तीन महिने निराधार दिव्यांगांना अनुदान न मिळाल्यामुळे त्यांच्यासमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. दिव्यांगामधून नेत्रहीनांची स्थिती तर फारच विदारक असून ते घर भाड्यापासून विज बिल आणि रोजच्या खाण्यापिण्यापर्यंत अडचणीत आले आहे. बहुतांशी नेत्रहीन दिव्यांग राज्यभरातील बस स्टॉप, इतर सार्वजनिक ठिकाण आणि रेल्वे गाड्यांमध्ये गोळ्या, चॉकलेट, बिस्किट विकून आपला उदरनिर्वाह करतात.

### दिनविशेष

**१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली**

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –१५४९४० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने –१४०१०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – २,८०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |





